मुंबईतील चर्चगेट विरार (धिमा मार्ग) सीएसटी-कल्याण (धिमा मार्ग) आणि सीएसटी-पनवेल या उपनगरीय रेल्वे मार्गावर Communication Base Train Control (CBTC) प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमयुटीपी/३३१६/प्र.क्र.०२/नवि-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ मार्च, २०१८.

प्रस्तावना:

मुंबईतील चर्चगेट-विरार (धिमा मार्ग) आणि सीएसटी-पनवेल या उपनगरीय रेल्वे मार्गावर Communication Base Train Control (CBTC) प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत येणाऱ्या एकुण खर्चातील राज्य शासनाच्या ५० टक्के हिस्स्यापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगर पालिका यांनी १५:१५:१५:५ या प्रमाणात खर्चाचा भार उचण्याबाबत धारणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात आता शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

मुंबईतील चर्चगेट-विरार (धिमा मार्ग) आणि सीएसटी-पनवेल या उपनगरीय रेल्वे मार्गावर Communication Base Train Control (CBTC) प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत येणाऱ्या एकूण खर्चातील राज्य शासनाच्या ५० टक्के हिस्स्यापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगर पालिका या संस्थांचा सहभाग पुढीलप्रमाणे असेल:

अ.क्र.	प्राधिकरण/महामंडळ /स्थनिक स्वराज्य संस्था	हिस्सा
१	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	१५ %
२	शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित	१५ %
३	बृहन्मुंबई महानगरपालिका	१५ %
४	नवी मुंबई महानगर पालिका	०५ %

२. उपरोक्त संस्थांनी यासंदर्भातील निधीची आर्थसंकल्पीय तरतूद करावी. तसेच, सदर प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी मिळताच सदर निधी मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन लि. यांच्याकडे सुपूर्द करण्याबाबतची तजविज संबंधित संस्थांनी ठेवावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३०९१४४७५६२८२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.03.09 17:19:11 +05'30'

(वि. श्री. पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. राज्य मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. प्रधान सचिव (निव-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

८. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन लि., चर्चगेट, मुंबई.

९. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगीक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्या., निर्मल भवन, नरिमन पॉईंट, मुंबई.

१०. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, सी.एस.टी. स्थानकासमोर, फोर्ट, मुंबई.

११. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर, नवी मुंबई.